## -सर्वसाधारण सभेची सूचना-

वाचाः-१) महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मध्ये कलम ५१अ-१

२) नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासन परिपत्रकक्रमांकः-संकिर्ण-२०१६/प्र.क्र.४६६/नवि-२० दि. २१.१२.२०१६

३) महाराष्ट्र नगरपरिषद (उपाध्यक्ष पदाची निवडणुक घेणे) नियम, २००५

४) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या करण्याची पध्दत)नियम, २०१०

५) मा. जिल्हाधिकारी यवतमाळ यांचे पत्रक्रमांक/नपप्र/कार्या-१/कावि-१३९९/२०२५ दि. ३१.१२.२०२५

---000---

प्रति,

श्री/श्रीमती. ------------------------------------------------------------------------------,

सदस्य / सदस्या, नगरपरिषद यवतमाळ जि. यवतमाळ

यांना कळविण्यात येते की, ज्याअर्थी, यवतमाळ नगरपरिषदेची सार्वत्रिक निवडणुक २०२५दिनांक २०.१२.२०२५ रोजी नव्यानेपार पडलेली आहे. आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ५१ अ-१ मध्ये करण्यात आलेल्या सुधारणा व नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासन परिपत्रक दि. २१.१२.२०१६अन्वये केलेल्या तरतुदीनुसार महाराष्ट्र नगरपरिषद (उपाध्यक्ष पदाची निवडणुक घेणे) नियम २००५ अन्वये नगरपरिषद उपाध्यक्ष पदाची निवडणुक घेणे, आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या करण्याची पध्दत) नियम, २०१० नुसार नामनिर्देशित सदस्यांचे नामनिर्देशन करणे क्रमप्राप्त आहे.

त्याअर्थी, अधिनियमातील उपरोक्त सुधारणा अन्वये मला प्रदान केलेल्या अधिकारानुसार मी, ॲड.प्रियदर्शनी अशोक उईके, अध्यक्ष, नगरपरिषद यवतमाळ जि. यवतमाळ सोबतच्या "जोडपत्र अ"मध्ये दर्शविलेले कामकाज चालविण्यासाठी दि. ०९.०१.२०२६ रोजी दुपारी ०१.०० वाजता, नगरपरिषद यवतमाळ जि. यवतमाळ येथील सभागृहात पहिली सर्वसाधारण सभा आयोजित करित आहे. सबब, सदर सभेस आपण वेळेवर उपस्थित राहावे. उपाध्यक्ष पदाच्या निवडणुकीचा कार्यक्रम व नामनिर्देशित करावयाच्या सदस्यांच्या नियुक्तीच्या कार्यवाहीचा तपशील सोबत अनुक्रमे अनुसूची-अ व अनुसूची-ब मध्ये यासोबत देण्यात येत आहे.

(ॲड.प्रियदर्शनी अशोक उईके)
पिठासीन अधिकारी तथा अध्यक्ष,
नगरपरिषद यवतमाळ जि. यवतमाळ

"जोडपत्र अ"

| विषय क्र. | विषय |
|---|---|
| १ | नगरपरिषद उपाध्यक्षाची निवड करणे |
| २ | नामनिर्देशित सदस्यांची नियुक्ती करणे |

* या सभेमध्ये वरील विषया व्यतिरिक्त इतर विषय चर्चिले जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

## अनुसूची-अ

## यवतमाळ नगरपरिषदेच्या उपाध्यक्ष पदाच्या निवडणुकीचा कार्यक्रम

| अ. क्र. | टप्पा | कार्यवाही कोणी/कोणाकडे करावयाची आहे. | टप्पा सुरु करण्याचा/ संपविण्याचा दिनांक | वेळ व ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | नामनिर्देशनपत्र दाखल करणे | मुख्याधिकारी, नगर परिषद यवतमाळ यांचेकडे | दि. ९.०१.२०२६ | सकाळी १०.०० ते दुपारी १२.०० वाजेपावेतो<br>**ठिकाण:-** नगरपरिषद मुख्याधिकारी कक्ष |
| २ | नामनिर्देशनपत्राची छाननी करणे | पिठासीन अधिकारी तथा अंध्यक्ष, नगर परिषद यवतमाळ | दि. ९.०१.२०२६ | दुपारी ०१.०० वाजता<br>**ठिकाण:-** नगरपरिषद प्रशासकीय इमारत ४ माळा सभागृह |
| ३ | वैधरित्या नामनिर्दिष्ठ उमेदवारांची यादी जाहीर करणे. | पिठासीन अधिकारी तथा अध्यक्ष, नगर परिषद यवतमाळ | दि. ९.०१.२०२६ | दुपारी ०१.०० वाजता होणाऱ्या सर्वसाधारण सभेत छाननी नंतर लगेच<br>**ठिकाण:-** नगरपरिषद प्रशासकीय इमारत ४ माळा सभागृह |
| ४ | उमेदवारी मागे घेणे | पिठासीन अधिकारी तथा अध्यक्ष, नगर परिषद यवतमाळ | दि. ९.०१.२०२६ | वैध उमेदवारांची यादी जाहीर केल्यानंतर १५ मिनिटांच्या आत<br>**ठिकाण:-** नगरपरिषद नगरपरिषद प्रशासकीय इमारत ४ माळा सभागृह सभागृह |
| ५ | उमेदवारी मागे घेतलेल्या उमेदवारांना नावांची यादी जाहीर करणे. | पिठासीन अधिकारी तथा अध्यक्ष, नगरपरिषद यवतमाळ | दि. ९.०१.२०२६ | उमेदवारांनी उमेदवारी मागे घेतल्यानंतर लगेच<br>**ठिकाण:-** नगरपरिषद नगरपरिषद प्रशासकीय इमारत ४ माळा सभागृह |
| ६ | आवश्यकता भासल्यास निवडणुक घेणे | पिठासीन अधिकारी तथा अध्यक्ष, नगरपरिषद यवतमाळ | दि. ९.०१.२०२६ | उमेदवारी मागे घेतलेल्या उमेदवारांची यादी वाचनानंतर लगेच<br>**ठिकाण:-** नगरपरिषद प्रशासकीय इमारत ४ माळा सभागृह |

## अनुसूची-ब

## यवतमाळ नगरपरिषदेच्या नामनिर्देशित सदस्यांच्या नियुक्तीचा तपशील

| अ.क्र. | टप्पा | कार्यवाही कोणी/कोणाकडे करावयाची आहे. | टप्पा सुरु करण्याचा/ संपविण्याचा दिनांक, वेळ व ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | पक्ष/गट/आघाडीचे प्रमुख यांनी प्रस्तावित सदस्यांचे नामनिर्देशन पत्र सादर करणे | उपविभागीय अधिकारी, यवतमाळ तथापदनिर्देशित अधिकारी यांनी जिल्हा सह आयुक्त, न.प.प्र., जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ यांचेकडुन प्राप्त नामनिर्देशन शिफारसपत्र व अर्हतेचे पुरावे यांची छाननी करुन अर्हता प्राप्त उमेदवारांची यादी संबंधित पक्ष/गट/आघाडी प्रमुखाकडे पाठवुन त्याची प्रत थेट निवडुन आलेल्या नगराध्यक्षाकडे पुढील कार्यवाही करीता बैठकीपुर्वी पाठवावी. | दि. ९.०१.२०२६ रोजी पूर्वी किमान २४ तास अगोदर जिल्हा सह आयुक्त, न.प.प्र., जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ यांचे कार्यालयात (सुट्टींचे दिवस वगळून) |
| २ | नगरपरिषद सदस्यांचे नामनिर्देशन करणे | पिठासीन अधिकारी तथा अध्यक्ष, नगरपरिषद यवतमाळ | दि. ९.०१.२०२६ रोजी आयोजित सभेत उपाध्यक्ष पदाची निवडणूक पार पडल्यानंतर लगेच **ठिकाण:-** नगरपरिषद नगरपरिषद प्रशासकीय इमारत ४ माळा सभागृह सभागृह |

(सही)

(ॲड.प्रियदर्शनी अशोक उईके)
**पिठासीन अधिकारी तथा अध्यक्ष,**
**नगरपरिषद यवतमाळ जि. यवतमाळ**

प्रत :-१) मा. जिल्हाधिकारी यवतमाळ यांना माहितीस सविनय सादर.

२) मा. उपविभागीय अधिकारी, यवतमाळ तथापदनिर्देशित अधिकारीयांना माहितीस सविनय सादर.

३) मुख्याधिकारी, नगरपरिषद यवतमाळ यांना उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.

# नगर परिषद यवतमाळ

## पहिली सर्वसाधारण सभा

**दिनांक 09/01/2026**

**वेळ दुपारी 1.00 वाजता.**

आज दिनांक 09/01/2026 रोजी शुक्रवार दुपारी 1.00 वाजता [वाचा (1) महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 51-अ-1 (अ (9), (2) महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-2016/प्रक्र. 466 नवि-20 मंत्रालय, मुंबई दि.21/12/2016, (3) महाराष्ट्र नगर परिषदा (उपाध्यक्ष पदाची निवडणुक घेणे) नियम 2005, (4) महाराष्ट्र नगर परिषद, नगर पंचायती (नामनिर्देशन सदस्यांची अर्हता व नियुक्त्या करण्याचे पध्दत) नियम, 2010 चे नियम 6, (5) मा. जिल्हाधिकारी यवतमाळ यांचे पत्र क्रमांक/नपप्र/कार्या-1/कावि-1399/2025 दि. 31.12.2025 अन्वये पहिली सर्वसाधारण सभा पिठासीन अधिकारी ॲड. प्रियदर्शनी अशोक उईके, नगराध्यक्ष, नगर परिषद, यवतमाळ, जि. यवतमाळ यांचे अध्यक्षतेखाली नगर परिषदेचे सभागृहात घेण्यात आली असता सभेला खालील प्रमाणे सदस्य उपस्थित होते

1) ॲड. प्रियदर्शनी अशोक उईके, नगराध्यक्ष न.प.यवतमाळ
2) कांबळे श्रीकृष्ण मारोती,नगरसेवक न.प.यवतमाळ
3) वनिता किशोर बडे,नगरसेविका न.प.यवतमाळ
4) चव्हाण सविता अत्तरसिंग, नगरसेविका न.प. यवतमाळ
5) गायकवाड आनंद बळीराम,नगर सेवक न.प. यवतमाळ
6) मिना राहुल मसराम, नगरसेविका न.प. यवतमाळ
7) आश्विन दिलीपराव बोपचे,नगरसेवक न.प. यवतमाळ
8) साधना विनोद काळे, नगरसेविका न.प. यवतमाळ
9) पिंटू उर्फ नितीन काशिनाथ बांगर, नगरसेवक न.प. यवतमाळ
10) परतेकी आकाश धनराज, नगरसेवक न.प. यवतमाळ
11) साबळे शोभा उध्दवराव, नगरसेविका न.प. यवतमाळ
12) सवाई वैशाली प्रविण, नगरसेविका न.प. यवतमाळ
13) पावडे विशाल सुधाकर, नगरसेवक न.प. यवतमाळ
14) करुणा किसनराव तेलंग, नगरसेवक न.प. यवतमाळ
15) भड़के श्रध्दा गजानन, नगरसेविका न.प. यवतमाळ
16) ठोंबरे लता रमेश, नगरसेविका न.प. यवतमाळ
17) किरण राकेश प्रजापती, नगरसेविका न.प. यवतमाळ
18) चैताली निलेश बेलोकर, नगरसेविका न.प. यवतमाळ
19) पूजा मंगल गायकी, नगरसेविका न.प. यवतमाळ
20) मीरा रामदास वीर, नगरसेविका न.प. यवतमाळ
21) डॉ. निरज वाघमारे, नगरसेवक न.प. यवतमाळ
22) खंडारे स्वाती अभिलाष, नगरसेविका न.प. यवतमाळ
23) अराठे देविदास नामदेवराव, नगरसेवक न.प. यवतमाळ
24) विजय दयाराम राय,नगरसेवक न.प. यवतमाळ

25) मनीषा योगेश भावे, नगरसेविका न.प. यवतमाळ
26) सुभाष दयाराम राय, नगरसेवक न.प. यवतमाळ
27) हरशे शोभा नाना, नगरसेविका न.प. यवतमाळ
28) शंभरकर साधना रविंद्र, नगरसेविका न.प. यवतमाळ
29) शाहीन परवीन मोहम्मद नईम, नगरसेविका न.प. यवतमाळ
30) अन्सारी जावेद परवेज अब्दुल समद, नगरसेवक न.प. यवतमाळ
31) शेख अंजुम परवीन मोहम्मद इरफान, नगरसेविका न.प. यवतमाळ
32) तबस्सुम मनवर शाह, नगरसेविका न.प. यवतमाळ
33) ब्राम्हणकर भारत दिगांबर, नगरसेवक न.प. यवतमाळ
34) नैताम अनुप हरिदास, नगरसेवक न.प. यवतमाळ
35) तिवारी अमृता ओमप्रकाश, नगरसेविका न.प. यवतमाळ
36) सोनाली मनोज तिडके , नगरसेविका न.प. यवतमाळ
37) शेरे माया मोतीलाल, नगरसेविका न.प. यवतमाळ
38) विलास उर्फ दत्ता वसंतराव कुलकर्णी, नगरसेवक न.प. यवतमाळ
39) चंद्रशेखर हरिकेशव चौधरी, नगरसेवक न.प. यवतमाळ
40) सपना संजय उपगन्लावार, नगरसेविका न.प. यवतमाळ
41) भवरे प्रियंका चेतन, नगरसेविका न.प. यवतमाळ
42) गिरी नित्यानंद अशोक , नगरसेवक न.प. यवतमाळ
43) बगाडे प्रमोद भास्कर, नगरसेवक न.प. यवतमाळ
44) संगिता उमेश बोबडे, नगरसेविका न.प. यवतमाळ
45) शिला प्रकाशराव मिर्झापुरे, नगरसेविका न.प. यवतमाळ
46) निता भास्करराव केळापुरे, नगरसेविका न.प. यवतमाळ
47) वैशाली प्रमोद उईके, नगरसेविका न.प. यवतमाळ
48) सपना संजय लंगोटे, नगरसेविका न.प. यवतमाळ
49) काळे दिलीप वामनराव, नगरसेवक न.प. यवतमाळ
50) राऊत किर्ती संतोष, नगरसेविका न.प. यवतमाळ
51) धावतोडे रिता गजानन, नगरसेविका न.प. यवतमाळ
52) देशमुख पंकज वसंतराव, नगरसेवक न.प. यवतमाळ
53) अर्चना दिनेश चिंडाले, नगरसेविका न.प. यवतमाळ
54) लोकेश वसंतराव इंगोले, नगरसेवक न.प. यवतमाळ
55) सोनाली पंकज मडावी, नगरसेविका न.प. यवतमाळ
56) बिपीन अनिल चौधरी, नगर सेवक न.प. यवतमाळ

तदनंतर सभेची सुचना दि. 02/01/2026 नुसार जोडपत्र 'अ' मध्ये नमुद केल्याप्रमाणे विषयावर कामकाज होवून निर्णय घेण्यात आले.

**विषय क्र. 1 :- नगर परिषद यवतमाळ उपाध्यक्षांची निवड करणे.**

**ठराव क्र. 1 :-** महाराष्ट्र नगरपरिषदा आणि नगर पंचायती (उपाध्यक्ष पदाची निवडणूक) नियम 2005 मधिल नियम 3(1), अन्वये दि. 09/01/2026 रोजी सकाळी 10.00 ते दुपारी 12.00 या विहीत वेळेत उपाध्यक्ष पदाकरिता एकुण 01 नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले. व ते सभागृहात वाचून दाखविण्यात आले त्यांचे नाव खालील प्रमाणे आहेत.

| उपाध्यक्ष पदाकरिता उमेदवारांची नांवे | | |
|---|---|---|
| अ.क्र. | नाव | पक्ष/ आघाडी |
| 1 | विलास उर्फ दत्ता वसंतराव कुलकर्णी | यवतमाळ शहर विकास आघाडी |

महाराष्ट्र नगर परिषदा आणि नगर पंचायती (उपाध्यक्ष पदाची निवडणूक) नियम 2005 मधिल नियम 6 अन्वये प्राप्त नामनिर्देशन पत्रांची छाननी दुपारी 1.04 वाजता करण्यात आली व उक्त नियमातील नियम 6 (2) नुसार वैध उमेदवारांची यादी वाचून दाखविण्यात आली. त्यांचे नाव खालीलप्रमाणे आहे.

| वैध उमेदवारांची नांवे | | |
|---|---|---|
| अ.क्र. | नाव | पक्ष/ आघाडी |
| 1 | विलास उर्फ दत्ता वसंतराव कुलकर्णी | यवतमाळ शहर विकास आघाडी |

वरीलप्रमाणे महाराष्ट्र नगर परिषदा आणि नगर पंचायती (उपाध्यक्ष पदाची निवडणूक) नियम 2005 मधिल नियम 6 (3) नुसार विहीत वेळेत (15 मिनीटाचे आत) उमेदवारी मागे घेणे बाबतची सुचना दुपारी 1.08 वा. देण्यात आली. 15 मिनिटाच्या वेळेत म्हणजेच 1.23 मिनिट पर्यंत प्राप्त नामनिर्देशन पत्र मागे घेण्यत आले नाही.

महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 (उपाध्यक्ष पदाकरिता निवडणूक) सुधारणा नियम 2006, कलम 7(1) प्रमाणे एकच वैध नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले होते. त्यानुसार **विलास उर्फ दत्ता वसंतराव कुलकर्णी यांची उपाध्यक्ष, नगर परिषद यवतमाळ** या पदावरिता रितसर निवडून आल्याचे घोषित करण्यात आले.

**विषय क्रं. :-2 नामनिर्देशन सदस्यांची नियुक्ती करणे.**

**ठराव क्र.:-2** दि. 09/01/2026 च्या सभेत यवतमाळ नगर परिषदेच्या उपाध्यक्षांचे निवडणूकी नंतर नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 9 (1) (ब) व महाराष्ट्र नगरपरिषदा व नगर पंचायती व औद्योगीक नगरी (तिसरी सुधारणा) अधिनियम 2006 मधील कलम 51 (ब) व महाराष्ट्र नगरपरिषदा व नगर पंचायतीची (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या करण्याची पध्दत) नियम 2010 चे नियम 6 तसेच नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व निवडणूक नियुक्त्या (सुधारणा) नियम 2006 नुसार नामनिर्देशन सदस्यांचे नियुक्तीची कार्यवाही सुरू करण्यात आली.

महाराष्ट्र नगर परिषद व नगरपंचायती (नामनिर्देशीत सदस्यांची अर्हता व नियुक्ती) नियम 2010 मधिल कलम 1 ते 8 ची सविस्तर माहिती सभागृहामध्ये देण्यात आली. त्यानंतर महाराष्ट्र नगरपरिषद व नगर पंचायती

(नामनिदर्शित सदस्यांची अर्हता व नियुक्ती) सुधारणा नियम 2010 मधिल कलम 3 नुसार नामनिर्देशित सदस्यांची संख्या निर्धारीत करण्यात आली.

नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 9 (1) (ब) प्रमाणे नि‍ाडून आलेल्या सदस्यांच्या एकुण संखेच्या दहा टक्यापेक्षा आधिक होणार नाहीत इतके किंवा पाच सदस्य यापैकी जी कमी असेल तेवढ्या संख्येतील नामनिर्देशित पालिका सदस्य यांचा समावेश असेल असे नमूद आहे. त्यानुसार यवतमाळ नगर परिषदे करिता 05 नामनिर्देशित सदस्य निर्धारीत करण्यात आल्याचे घोषीत केले.

करिता मा. जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचे पत्र क्रमांक/नपप्र/कार्या-1/कावि-1400/2025 दि. 31/12/2025 नुसार (1) महाराष्ट्र नगरारिषदा, नगरपंचायती (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या करण्याची पध्दत) नियम 2010 नुसार यवतमाळ नगर परिषदे करिता नामनिर्देशित सदस्याचे नामनिर्देशन पत्र मा. उपविभागीय अधिकारी, यवतमाळ यांचे मार्फत छानणी करुन तौलनिक संख्याबळाचे आधारावर पात्र नामनिर्देशनपत्र प्राप्त झाली असून ती खालीलप्रमाणे आहेत.

**यवतमाळ शहर विकास आघाडी** करिता तौलनिक बळानुसार अनुज्ञेय सदस्य संख्या 3 (तीन) असुन

1. देशमुख अमोल ओंकारराव
2. कोठेकर रेखा अशोक
3. नानवाणी पंकज सुंदरलाल

यांचे नामनिर्देशन पात्र होते.

तर **भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस** या पक्षाकरिता तौलनिक बळानुसार अनुज्ञेय सदस्य संख्या 1 (एक) असुन

1. संतोष भगवान बोरले
2. अब्दुल जाकीर अब्दुल करिम

यांचे नामनिर्देशन पात्र होते.

तर **शिवसेना** गट या आघाडी करिता तौलनिक बळानुसार अनुज्ञेय सदस्य संख्या 1 ( एक) असुन

1. इंगोले गजानन गुलाबराव
2. गावंडे विवेक दिगांबर
3. गणात्रा विशाल राजेश

यांचे नामनिर्देशन पात्र होते.

शिवसेना व भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस या पक्षाचे तौलनिक संख्याबळ पेक्षा आधिक उमेदवार वैध आहेत. त्यामुळे संबंधित गटनेता यांनी लेखी स्वरूपात तौलनिक संख्याबळानुसार नावे सादर करणेसाठी कळविण्यात आले होते.

त्यानुसार यवतमाळ शहर विकास आघाडी या पक्षाचे गटनेते श्री. नित्यानंद अशोक गिरी यांनी तौलनिक संख्याबळानुसार कोठेकर रेखा अशोक, देशमुख अमोल ओंकारराव व नानवाणी पंकज सुंदरलाल या उमेदवारांचे नाव लेखी स्वरूपात दिले होते. तसेच भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस या पक्षाचे गटनेत्या सौ. वैशाली प्रविण सवाई यांनी तौलनिक संख्याबळानुसार संतोष भगवान बोरले या उमेदवारांचे नाव लेखी स्वरूपात दिले होते. तसेच शिवसेना या पक्षाचे गटनेत्या सौ. चैताली निलेश बेलोकार यांनी तौलनिक संख्याबळानुसार इंगोले गजानन गुलाबराव या उमेदवारांचे नाव लेखी स्वरूपात दिले होते.

त्यानुसार महाराष्ट्र नगर परिषदा व नगर पंचायती (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्ती सुधारणा नियम 2010 यवतमाळ नगर परिषद करिता 05 नामनिर्देशित सदस्य निर्धारित करण्यात आले असुन, वरील नामनिर्देशनास पात्र असलेले सदस्य पुढीलप्रमाणे

1. कोठेकर रेखा अशोक
2. देशमुख अमोल ओंकारराव
3. नानवाणी पंकज सुंदरलाल
4. संतोष भगवान बोरले
5. इंगोले गजानन गुलाबराव

या पाच सदस्यांची नामनिर्देशित सदस्य म्हणुन रितसर निवड झाल्याचे जाहीर करण्यात आले. उपस्थित सर्व सन्माननिय सदस्यांचे आभार व्यक्त करत सभा संपल्याचे जाहीर करण्यात आले.

प्रस्ताव मंजुर.

PAuike 09/01/2026

(ॲड.प्रियदर्शनी अशोक उईके)
पिठासीन अधिकारी तथा अध्यक्ष,
नगरपरिषद यवतमाळ जि. यवतमाळ